नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 14/08/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील मेटकर ले आउट नरखेड येथे फिर्यादी नामे– अरविंद माधवराव घोडे, वय 60 वर्ष, रा. मेटकर ले आउट नरखेड हे विटा इंडस्ट्रीयल (डोलामाईट फॅक्ट्री) मौदी येथे मॅनेजर या पदावर आहेत. फिर्यादी हे दिनांक 05/08/2021 रोजी नागपुरला मुलीचे डिलीवरी करीता घराला कुलुप लावुन गेले आणि नागपुरला थांबले होते. दि. 13/08/2021 रोजी त्यांचे घरी चोरी झाल्याचे माहिती मिळाल्याने ते आपले घरी येवुन पाहले असता, घरातील आलमारीत ठेवलेले सोन्याचे तिन गोप व सोन्याचे दागिने कि. 73,000/–रू. दिसुन आले नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश करून सोन्याचे दागीने किमत 73,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजु गजभिये 9850845542 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील नाईक ले आउट, सावनेर येथे दिनांक 10/08/2021 चे 17.00 वा. ते दिनांक 12/08/2021 चे 21.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सत्यवान दिलीपसिंग बंम्होरे, वय 51 वर्ष, रा.नाईक ले आउट सावनेर यांचे बंद घराचे कंपाउन्ड गेट चा कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन राहते घराचे मुख्य दाराचा ताला तोडुन घ्रात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बेडरूम मधील लोंखडी पेटीतील व लोंखडी आलमारी मधील सोण्या–चांदीचे दागिणे एकुण किंमती 38,500/–रू. व नगदी 15,000/–रू. असा एकुण कि. 53,500/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री नागवे मो. नं. 9823403565 हे करीत आहे.

3) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 07 कि. मी. अंतरावरील गवासुत उमरेड येथे दिनांक 12/08/2021 चे 23.00 वा. ते दिनांक 13/08/2021 चे 16.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गौतम सुर्यभान मेंढे, वय 40 वर्ष, रा. गावसुत ता उमरेड यांची पत्नी उठली असता तिला रूममधील गोदरेजचा दरवाजा उघडा दिसला व सामान अस्थव्यस्थ फेकलेले दिसले. दुसऱ्या रूममधील देखील गोदरेजचा कपाटाचा दरवाजा उधडून सामान अस्थाव्यस्थ फेकलेले दिसले. फिर्यादीने पाहीले असता गोदरेज चेक केले तर एका रूममधील गोदरेजचा कुलुप तोडून लॉकरमध्ये ठेवलेले जुने वापरते सोन्याचे दागिने एकुण कि. 54,000/–रू. व नगदी 35,000/–रू. व दुस–या गोदरेज कपाटात ठेवलेले 11,000/–रू. एकुण नगदी 46,000/–रू. असा एकुण 1,00,000/–रू. चा माल गोदरेज च्या कपाटाचा कुलुप तोडुन अज्ञात आरोपीने चोरून नेले. तसेच गावातील लताबाई चौधरी यांचे घरचे देखील जुने वापरते सोन्याचे दागिने एकूण कि. 63,000/–रू. व नगदी 20,000/–रू. असा एकुण कि. 83000/–रू. चा माल तसेच विठ्ठल वालकटे यांचा सॅमसॅग कंपनीचा अॅड्राईड मोबाईल कि. 11,000/–रू. चा माल असा एकुण कि. 1,94,000/– रू. चा मुद्देमाल चोरून अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राजु डोर्लीकर मो.क्र. 75882377641 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर